# प्रकरण सातवे

# प्रकरण सातवे

# समारोप

## प्रस्तावना

या प्रकरणात सातारा नगरपालिकेचे वित्तीय प्रशासन एक व्यष्टी अध्ययन (२००१-२००६) या बाबतीत सारांश आणि शिफारशी मांडलेल्या आहेत.

प्रशासनात आर्थिक प्रशासन हा अत्यावश्यक घटक मानला जातो. शासनाची प्रत्येक कृती आर्थिक प्रशासनावर आधारलेली असते. प्रशासकीय कामे व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी पुरेसा पैसा असला पाहिजे आणि तो काळजीपूर्वक खर्च केला पाहिजे म्हणूनच आर्थिक प्रशासनास फार महत्व प्राप्त झाले आहे. आर्थिक प्रशासनात प्रशासकीय कामासाठी लागणारा पैसा उभारणे आणि त्याचा विनियोग करणे या दोन्ही गोष्टींचा प्रामुख्याने समावेश होतो.

प्रशासन व वित्तव्यवस्था यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे. वित्ताशिवाय प्रशासन कार्य करु शकणार नाही. लोककल्याणाची बहुविध कार्ये पार पाडण्यासाठी पैशाची व्यवस्था करावी लागते. तसेच विविध कार्यासाठी जमा झालेला पैसा कोणत्या पद्धतीने खर्च करावा यासाठी सरकारला वित्तीय प्रशासन व्यवस्था करावी लागते. वित्तिय प्रशासन ही एक गतीशील प्रक्रिया असून ते लोकप्रशासनाचे महत्वाचे अंग आहे. विलोबींच्या मते, 'कार्यक्षम प्रशासन व्यवस्थेत वित्तीय प्रशासन हा अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो.' वित्तीय प्रशासनात करव्यवस्था, उत्पन्नाची, इतर साधनांची व्यवस्था, खर्चाची योजना, जमा व खर्च यांची हिशोब पद्धती, हिशोब तपासण्याची व्यवस्था इ. गोष्टींचा समावेश केला जातो.

अंदाजपत्रक सरकारच्या आय व व्ययाचा तक्ता असतो. काहींच्या मते अंदाजपत्रक हे सरकारच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्याचे साधन आहे. मनरो यांच्या मते, 'अंदाजपत्रक एक प्रकारे आगामी आर्थिक वर्षासाठी आर्थिक योजनांचा प्रलेख असून त्यात एका बाजूला अनुमानित उत्पन्न आणि दुसऱ्या बाजूस संपूर्ण खर्चाचे वर्णन केलेले असते.' म्हणून त्यास अर्थसंकल्पही म्हणतात. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या कलम

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

१०१ व महाराष्ट्र लेखासंहिता नियम २५ यांच्या तरतुदीनुसार नगरपालिका मुख्याधिकारी यांनी प्रथम अर्थसंकल्प तयार करुन स्थायी समितीपुढे सादर करावयाचा असतो. ही प्रक्रिया डिसेंबर अखेरीस पूर्ण होणे गरजेचे असते. नगरपालिकेने अर्थसंकल्प तयार करताना परिपत्रक १९८८ नुसार काही विशेष काळजी घेणे गरजेचे असते. नगरपालिकेच्या कार्यक्षम आर्थिक व्यवस्थापनासाठी अंदाजपत्रक आवश्यक असते. यामुळे नगरपालिकेला वित्तीय कारभार करण्यास मदत होते. उपलब्ध पैशाचा आधार आणि भविष्यकालीन गरजा लक्षात घेऊन पैसा उभारणीचे कार्य याद्वारे होते. अंदाजपत्रकामुळे नगरपालिका कोणती कार्ये, योजना कार्यक्रम वर्षभरात करणार आहे ते स्पष्ट होत असते. या अभ्यासामुळे सातारा नगरपालिकेने कोणत्या कार्यावर २००१-०२ ते २००५-०६ या ५ वर्षात भर दिला हे लक्षात येते. त्यामुळे सातारा नगरपालिका, सातारा शहरातील लोकांच्या विकासाच्या दृष्टीने कोणत्या दिशेने प्रयत्नशील आहे हे लक्षात येते. सामान्य जनतेच्या माहितीच्या आणि राजकिय जागृतीच्या दृष्टीने अशा अंदाजपत्रकाचा अभ्यास होणे लोकप्रशासनात आवश्यक आहे.

सातारा नगरपालिकेची स्थापना १ ऑगस्ट १८५३ साली झाली. तर १८७५ मध्ये नगरपालिकेचे टाऊन म्युनिसिपालीटीत रूपांतर झाले आणि मार्च १८८४ मध्ये सिटी म्युनिसिपालिटी म्हणून रुपांतर झाले. सन १८८२-८३ मध्ये नगरपालिकेचे उत्पन्न केवळ ५१,२७० रु. व खर्च ९३,०८० रु. होता. सन १८६६ मध्ये प्रथम घरपट्टी आकारण्यात आली. घरांचे चार वर्ग करुन त्यावर सालीना अनुक्रमे रु. ८, रु. ४ व रु. २ व रु. १ या प्रमाणात घरपट्टी बसवली. १८८२ साली वाहने व जनावरांवर कर आकारणी सुरु झाली. १८९३ पासून खाजगी पाणीकर घेण्यास सुरुवात झाली. १८८५ पर्यंत शहरातील सर्व शाळा सरकारी किंवा खाजगी होत्या. दिनांक १ एप्रिल १८८५ रोजी नगरपालिकेने प्राथमिक शिक्षण ताब्यात घेऊन सात मराठी शाळा व एक रात्रीची शाळा व एक मुलींची शाळा सुरु केली.

नगरपालिका सदस्यांसाठी १८८५ मध्ये पहिली निवडणूक झाली. शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी नगरपालिकेने १८८६ मध्ये कास तलाव बांधला. १९३५ मध्ये या पाणीपुरवठा योजनेत वीज उत्पन्न करण्याच्या दृष्टीने बदल करण्यात आला. त्यामुळे पाणीपुरवठ्यासह शहरास विजेचा पुरवठा होऊ लागला. सातारा जिल्ह्यासाठी शासनाने १८

नोव्हेंबर १९६३ रोजी नगररचना व विकास योजनांसाठी सातारा येथे नगररचना कार्यालय उघडले. दि. १ मे १९८२ पासून सातारा ही अ वर्ग नगरपालिका झाली. सातारा नगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत खालीलरित्या मोठ्या प्रमाणात आहेत.

सातारा नगरपालिका शिक्षण, सार्वजनिकआरोग्य, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, पाणीपुरवठा व्यवस्था, सांडपाणी, घनकचरा, शौचालय, उद्याने यांचे व्यवस्थापन, वृक्षारोपण, सामाजिक केंद्रे अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामे, सार्वजनिक ग्रंथालये आणि अग्निशमन दल या कार्यक्षेत्रांमध्ये कार्य करीत असते. सातारा नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या ५४ बालवाड्या असून नगरपालिका शाळांची संख्या २१ आहे. यातील शिक्षकांची संख्या १२३ असून यावरील एकूण वार्षिक खर्च रु. २,५४,१५,४०७ आहे. सातारा नगरपालिकेच्या भौगोलीक क्षेत्रात दोन प्रसूतिगृहे आहेत. शहरात एकूण १२८ कि.मी. लांबीचे रस्ते असून ते काँक्रीटचे आहेत आणि फक्त ८ कि.मी. रस्त्यांमध्ये दिवाबत्तीची सोय नाही. शहरात ११५० नळ कनेक्शन असून त्यापासून नगरवासियांना पुरेसे पिण्याचे पाणी मिळते. शहरात एकूण २२,२२० घरे असून त्यापैकी १७,८०० घरे सिवरेजला जोडलेली आहेत. या २२,२२० घरांपैकी केवळ ११६ घरांना वैयक्तिक शौचालय नाही. परंतू पुरेशी सार्वजनिक शौचालये नगरपालिकेने आपल्या कक्षेत उभारलेली आहेत. शहरात बगीचे आणि सामाजिक केंद्र पुरेशी आहेत. शहरातील निसर्गाच्या बाबतीतदेखील जागरुकता असून वृक्षारोपणाच्या कार्यावरसुद्धा पुरेसे महत्त्व दिलेले आहे.

सातारा नगरपालिकेस अनेक प्रकारच्या करांमधून महसूल प्राप्त होतो. सातारा नगरपालिकेच्या वित्तीय स्त्रोतांचे वर्गीकरण ५ विभागात आहे.

अ) नगरपालिका दर व कर – या विभागात वृक्षकर, जमिनी व इमारतींवरील कर, जाहीरात कर, वगैरे करांचा समावेश होतो.

ब) विशेष अधिनियमांखालील वसुली – या विभागात भेसळ प्रतिबंधक परवाना फीचा समावेश आहे.

क) या विभागात नगरपालिकेच्या मालमत्ता आणि उपयोगिता सेवा यांच्यापासून मिळालेला महसूल कर आकारणी व्यतिरिक्त इतर घटकांचा समावेश आहे. जसे की इमारत भाडे, जमीन भाडे, शाहू कला मंदीर भाडे, स्टेडियम वापर फी, पोहणे फी, मंडई भाडे वगैरे.

ड) या विभागात अनुदाने व अंशदानांचा समावेश होतो. या अंतर्गत महागाई भत्ता, शासनाकडून जकात नुकसान भरपाई अनुदान, समान संवर्गाच्या पदांचे वेतन व भत्ते, अल्पबचत अनुदान वगैरे सरकारकडून मिळणाऱ्या अनुदाने व अंशदानांचा समावेश आहे.

इ) हा विभाग संकीर्ण आहे यात नगरपालिकेच्या गुंतवणुकीवरील व्याज, जुन्या भांडार विक्री उत्पन्न वगैरेंचा समावेश होतो.

या करांच्या वसुलीतून मिळालेल्या रकमेतून सातारा नगरपालिकेने जलदाय योजना, शहरविकास योजना या अंतर्गत सातारा शहरामध्ये विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे, काँक्रीटीकरण करणे, खडीकरण करणे, रस्त्यांत मुरुम टाकणे, डांबराचे पॅचिंग करणे, फूटपाथ बांधणे, तसेच इतर अनेक महत्त्वाची विकास कामे पार पाडते. तसेच सार्वजनिक आरोग्याच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक शौचालयांची निर्मिती करणे, यासारखी कामे करते. मागासवर्गीयांसाठी समाजमंदीरे बांधणे, सांस्कृतिक भवन उभारणे यासारखी कामे सातारा नगरपालिकेने केलेली आहेत. महिला व बालकल्याण या कार्यक्षेत्रात महिलांची आरोग्यशिबिरे घेणे, लसीकरणाची कामे पार पाडली जातात. याशिवाय बगीचा व्यवस्थापन, शहराचे सौंदर्यीकरण याविषयी काम पार पाडते.

सातारा नगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचे स्वरुप अनेकात्मक आहे त्यामुळे पहिले सातारा नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक मुख्याधिकारी तयार करुन स्थायी समितीची मान्यता घेऊन सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन त्यास अंतीम रुप देतात. तद्नंतर प्रशासकीय पदसोपान रचना पद्धती अनुसरुन मा. संचालक नगरपालिका प्रशासन, नगरविकास विभाग प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन, उपमुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा पुणे, मुख्याधिकारी नगरपालिका उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठवले जाते. यास संमती मिळाल्यानंतर त्यांची अंमलबजावणी सुरु होते. या प्रक्रिया सर्वसाधारण अंदाजपत्रकास देखील लागू पडतात. नगरपालिकेच्या शिक्षणमंडळाच्या जमा बाजूस नगरपालिका सातारा यांची जमा,

शासकीय अनुदाने, अॅडव्हान्स डिपॉझिट आणि फी, व्याज वगैरेतून जमलेली किरकोळ जमा यांचा समावेश होतो. उदा. २००१-०२ साली एकूण रु. २,७८,८४,०५६, २००२-०३ साली रु. २,७७,७०,२६१, २००३-०४ मध्ये रु. २,६२,०९,६४६ आणि २००५-०६ मध्ये एकूण रु. ३,३६,४२,४६१ मिळाले आहे. शिक्षणमंडळाच्या कारभारासाठी २००१-०२ या काळातील एकूण रु. २,८६,७६,७७७, २००२-०३ या साली रु, २,८०,६४,३८४, २००३-०४ साली एकूण रु. २,५४,१५,४०७ आणि २००५-०६ साली ३,३०,५१,८८४ रु. इतका खर्च झालेला आहे. म्हणजे वरीलपैकी पहिले २ वर्षे उत्पन्नापेक्षा थोडा खर्च जास्त झाला आहे. याउलट उरलेले २ वर्षे थोडासा खर्च कमी झाला आहे.

सातारा नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबींमध्ये प्रारंभिक शिल्लक, अ) नगरपालिका दर व कर, ब) विशेष अधिनियमांखालील वसुली, क) नगरपालिकेच्या मालमत्ता आणि उपयोगिता यांच्या व्यतिरिक्त शक्ती, ड) अनुदाने व अंशदाने, इ) संकीर्ण या घटकांचा समावेश होतो. उदा. २००१-०२ या वर्षी रु. १३,९१,३५,४३४ पासून २००५-०६ रु. २०,५६,६३,५४३ इतके वाढत गेलेले आहे. अनुदाने व अंशदानातून सर्वात जास्त उत्पन्न प्राप्त झालेले आहे. नगरपालिकेच्या खर्च घटकांमध्ये अ) सामान्य प्रशासन व वसुलीचा खर्च, ब) सार्वजनिक सुरक्षितता, क) आरोग्य व सोयी, ड) शिक्षण, इ) अंशदाने, फ) संकीर्ण या घटकांचा समावेश होतो. नगरपालिकेच्या कारभारासाठी २००१-०२ या काळात एकूण खर्च रु. १४,९९,४७,३३७, २००२-०३ साली १४,७६,२४,९५२, २००३-०४ या वर्षी १३,९५,८४,४२०, २००४-०५ या साली १२,०१,५२,६७६ आणि २००५-०६ यावर्षी रू. १५,५२,४६,३८१ इतका खर्च झालेला आहे. या खर्चामध्ये क) आरोग्य व सोयी या घटकावर सर्वात जास्त खर्च झालेला आहे.

सातारा नगरपालिकेच्या वसुलीच्या कार्यात हलगर्जीपणा दिसून आलेला आहे. उत्पन्नाच्या मोठ्या स्त्रोतामधील म्हणजे १) एकत्रित कर , २) विशेष शिक्षण कर, ३) पाणीकर, ४) शासन शिक्षण कर, ५) शासन रोजगार हमी कर, ६) वृक्षकर यांचेवर लादलेल्या करांची वसुली अत्यंत कमी म्हणजे ३०% पेक्षा कमी आहे. म्हणजे सातारा नगरपालिका वसुली कर्मचारी वर्गाने त्यांचे काम पुरेपुर सक्षम रितीने पार पाडले नाही हे स्पष्ट होते.

सातारा नगरपालिका आपला कारभार कशा पद्धतीने पार पाडते यासाठी लेखा परिक्षकांच्या सन २००१-०२ ते २००५-०६ या अहवालांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या अहवालात नगरपालिका तिचा कारभार पार पाडताना म्हणजे अंदाजपत्रक तयार करण्यापासून अंमलबजावणी करेपर्यंतचे प्रक्रियेबद्दल माहितीचे विवेचन केले आहे. लेखापरिक्षकांनी वरील अहवालातील त्यांचे महत्त्वाचे आक्षेप खालीलप्रमाणे मांडलेले आहेत.

१. त्यांच्यामते २००१-०२, २००२-०३ च्या मागील ३ वर्षाच्या सर्वसाधारण जमा खर्चाचा विचार करता वार्षिक सरासरी तूट १,६५,७५,८३१ रु. आहे.

२. सन २००३-०४ च्या अहवालात नगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवरील विचार करताना प्रथमदर्शनी मत्तेपेक्षा दायित्व रु. १५,१७,७२,९३१ ने अधिक आहे. तसेच सर्व करांची थकबाकी रु, ४५,४९,८१२ ही रक्कम पूर्णपणे वसूल झाल्याखेरीज मत्ता म्हणून गणता येणार नाही. सदर रक्कम मत्तेतून वजा केल्यास मत्तेवर दायित्वाचे अधिक्य रु. १५,६३,२२,४७३ इतके येते. सदर बाब गंभीर आहे.

३. लेखापरिक्षकांचे सन २००४-०५ च्या अहवालातील नगरपालिकेच्या ३ वर्षाच्या सर्वसाधारण व भांडवली खर्चाचा विचार करता महसूली जमेचे अधिक्य रु. २,६१,३६,३६५ आहे. तर भांडवली खर्चाचे सरासरी अधिक्य रु, ७०,६०,७७८ इतके आहे. उपरोक्त मत्ता दायित्व तसेच मागील ३ वर्षातील महसूली व भांडवली जमा खर्चाचा विचार करता नगरपालिकेची आर्थिकस्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. तसेच सन २००५-०६ च्या अहवालातील नगरपालिकेच्या मागील ३ वर्षाच्या सर्वसाधारण व भांडवली खर्चाचा विचार करता महसूली जमेचे अधिक्य रु. २,२९,१८,८४६ आहे. भांडवली जमा खर्च शतप्रतीशत झाला आहे. यातून सातारा नगरपालिकेचा आर्थिक व्यवहार एकंदरीत चिंताजनक आहे हे स्पष्ट होते. सातारा नगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वरील अहवालामध्ये लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे महत्वाच्या उपाय योजना सुचवलेल्या आहे.

१. नगरपालिकेच्या भांडवली खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि या खर्चात कपात करणे.

२. संकलित करांच्या मागणीच्या तुलनेत वसुलीचे प्रमाण कमी असल्याने वसुलीचे प्रमाण वाढवणे तसेच जागा व इमारत भाड्याची थकबाकीची त्वरीत वसुली करणे.

३. नगरपालिकेची पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने त्वरित पावले उचलणे तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या थकबाकीचे दायित्व कमी करण्याचे प्रयत्न करावेत.

४. थकीत अग्रीम धनाची रक्कमेची वसुली करणे.

५. नगरपालिकेने विविध योजनांसाठी घेतलेल्या कर्जाच्या व्याजाची रक्कम अदा करावी लागत असल्याने नगरपालिकेने घेतलेल्या एकूण १८ कर्जांची संख्या कमी करावी.

लेखापरिक्षकांनी केलेल्या आक्षेपाबद्दल नगरपालिकेने खालीलप्रमाणे उत्तरे दिलेली आहेत.

१) नगरपालिकेच्या संकलित करांच्या वसुलीचे प्रमाण वाढवणेसाठी त्वरित घरपट्टीची बिले पाठवून वस्तूची, नोटीस, जप्ती, व्याज आकारणे, नागरिकांना जाहिर आवाहन करणे, नळ कनेक्शन बंद करणे, आवश्यकता असल्यास कायदेशीर कारवाई करणे इ. मार्गांचा अवलंब करुन नगरपालिका करांची वसुली करणेची कार्यवाही सुरु आहे.

२) थकीत अग्रीम रकमांची वसुली करणेची कार्यवाही सुरु आहे.

३) भांडवली खर्चात जितकी काटकसर करता येईल ती करणेच्या दृष्टीने कार्यवाही केली असून भांडवली खर्चावर जास्तीत जास्त नियंत्रण ठेवले जात आहे.

परंतू वस्तुस्थितीत नगरपालिकेच्या आर्थिक व्यवहारात लक्षणिय सकारात्मक बदल दिसून येत नाही.

सातारा नगरपालिकेच्या विविध कार्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना गैरव्यवहार होणे स्वाभाविक आहे. यात प्रशासकीय, तांत्रिक आणि वित्तीय गोष्टी समाविष्ट असतात. त्यामध्ये प्रामुख्याने अंदाजपत्रके सदोष आहेत आणि अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया आणि काही कार्यक्रम घेताना प्रशासकीय किंवा तांत्रिक मान्यता घेतलेली नाही. काही कामात अंदाजपत्रकातील मंजूर रकमेपेक्षा जास्त रक्कम खर्च झाली आहे आणि अर्थव्यवहाराबद्दल लागणाऱ्या कागदपत्रे व्यवस्थितरित्या ठेवलेली नाहीत. वरील सर्व

गोष्टीची दखल घेऊन अशा दोषांची पुनरावृत्ती न होण्यासाठी दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे.

नगरपालिकेच्या कारभाराबद्दल अधिकारीवर्ग, लोकप्रतिनिधी यांनी असे मत व्यक्त केले की अंडर ग्राऊंड ड्रेनेज, रस्ते रुंदीकरण दुर्लक्ष केले आहे. भुयारी गटर योजना, रस्ते रुंदीकरण, सांडपाणी व्यवस्था, पार्कींग सुविधा, सद्यपरिस्थितीत गरजेचे आहे असे सांगितले आहे. भविष्यकाळातील पाणीपुरवठा आणि अंडरग्राऊंड योजनेला सातारा नगरपालिकेने नजीकच्या भविष्यकाळात लक्ष द्यावे असे नमूद केले आहे.

अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रक्रियेबद्दल अधिकारी वर्ग आणि लोकप्रतिनिधींनी असे मत मांडले आहे की, नगरपालिकेचे उत्पन्न, विकास, शासकीय अनुदाने व सर्वांना समान न्याय या गोष्टींचा विचार केला जातो. परंतू अधिकारीवर्ग वगळता वरील गोष्टींबद्दल नगरपालिकेचे लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणावर अनभिज्ञ आहेत आणि त्यांनी नगरपालिकेचे कर आकारणी कर्मचारीवर्ग काम वेळेवर पार पाडतात असे मत व्यक्त केले आहे परंतू मागील प्रकरणात पाहिल्यास वस्तुस्थितीत थकबाकी संबंधीत तक्ते आणि लेखापरिक्षकांचे अहवालामधून सुस्पष्ट होते की मोठ्या प्रमाणात थकबाकी असून लेखापरिक्षक त्यांच्या अहवालात वारंवार थकबाकी वसूल करण्याबद्दल नगरपालिकेला सूचना दिलेल्या दिसतात म्हणजे करवसुलीबद्दल प्रत्यक्षात हलगर्जीपणा केलेला आहे आणि याबद्दल काटेकोर दक्षता घेणे आवश्यक आहे.

थकबाकीचे कारण सांगताना अधिकारी व लोकप्रतिनिधींनी सांगीतले आहे की, अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत आणि अनेक नागरीक कर भरणे जाणीवपूर्वक टाळतात आणि वसुलीदेखील होत नाही. त्यांनी थकबाकीदार वर्गातील मोठ्या प्रमाणात श्रीमंत आणि मध्यम वर्ग असून गरीब वर्ग तुलनेने कमी आहे असे मत व्यक्त केले आहे. ही प्रवृत्ती फक्त सातारा नगरपालिके पुरती मर्यादित नसून संपूर्ण देशात ही प्रवृत्ती पसरलेली आहे आणि श्रीमंत थकबाकीदार वर्गावर कडक कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. सरकारी नोकरवर्गाने कोणत्याही अशा अमिषाला किंवा दबावाला बळी न पडता त्यांना दिलेले अधिकार निर्भिडपणे वापरून त्यांची जबाबदारी सक्षमरितीने पार पाडण्याची गरज आहे.

त्यांनी सतर्क होण्यासाठी आजूबाजूच्या नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधी व अधिकारी वर्गाशी मिसळून विचारांची देवाण घेवाण करण्यासाठी, नगरपालिकेचे उत्पन्न व विकास करण्यासाठी वर्षाला एकतरी कार्यशाळेचे आयोजन करणे आवश्यक आहे.

सातारा नगरपालिकेने थकबाकी वसूल करण्यासाठी जप्ती, पाणीपुरवठा बंद करणे, लायसेन्स जप्त करणे, उशीरा कर भरणाऱ्यांना त्यांचे व्याज भरावयास लावणे असे मार्ग वापरले आहेत.


सातारा नगरपालिकेच्या कारभाराबद्दल नागरिकांनी नगरपालिकेने शिक्षण, पाणीपुरवठा आरोग्य व स्वच्छता आणि महिला व बाल कल्याण या विभागांमद्दल समाधान व्यक्त केले आहे. तसेच सातारा नगरपालिकेने आरोग्य आणि स्वच्छता क्षेत्राकडे अधिक दुर्लक्ष केलेले आहे तसेच बांधकाम व पाणीपुरवठाकडे दुर्लक्ष केलेले आहे आणि याबाबतीत दुर्लक्षाची कारणे १) नियोजनाचा अभाव, २) भ्रष्टाचार, ३) अधिकाऱ्यांचे बेजबाबदार वर्तन, ४) कर्मचाऱ्यांची कमतरता आणि ५) लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष ही आहेत.

नागरिकांनी सातारा नगरपालिकेत भ्रष्टाचार होतो हे मत स्विकारलेले आहे आणि याची क्षेत्रे बांधकाम, शिक्षण आणि स्वच्छता आरोग्य अशी असून त्यामध्ये राजकारण्यांचा वाटा जास्त असला तरी राजकारणी आणि नोकरवर्ग एकत्रितरित्या समाविष्ट आहेत. नागरिकांनी भ्रष्टाचार रोखण्यासाठी पारदर्शक प्रशासन, नगरसेवकांचे नि:स्वार्थी, स्वच्छ वर्तन आणि नागरिकांची जागरुकता याबद्दल जास्त भर दिलेला आहे.

सातारा नगरपालिकेने सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सातारा शहरातच उच्च शिक्षणाची सोय करावी, स्थानिक बेरोजगारांच्या रोजगाराचा प्रश्न सुटण्याच्या हेतूने सातारा नगरपालिकेने औद्योगिक क्षेत्रात पदार्पण करावे, साताऱ्यातील वाहतुकीचा प्रश्न सोडवण्यासाठी उड्डाणपूल, रस्ते रुंदीकरण इ. गोष्टी निर्माण कराव्या, सातारा शहर सुंदर व स्वच्छ होण्यासाठी बागा, आयलँडस् करावे, वृक्षारोपणावर भर द्यावा, आरोग्य व स्वच्छता या विभागाकडे अधिक लक्ष द्यावे तसेच आजच्या काळाची गरज म्हणून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात पदार्पण करावे आणि शहरातील उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी क्रिडाक्षेत्रात अधिक कार्य करावे अशा अपेक्षा केल्या आहेत.

या माहितीच्या अनुषंगाने असा निष्कर्ष काढता येतो की, शहरातील सर्वसामान्य नागरिकांना आपल्या नगरपालिका प्रशासनाकडून बऱ्याच अपेक्षा आहेत की, ज्या सातारा नगरपालिकेने लक्षात घेणे योग्य आहे. वरील गोष्टी साकार होण्यासाठी सातारा नगरपालिकेकडून स्वच्छ आणि परिणामकारक प्रशासनाची प्रतिक्षा करत आहे.





मान्यवरांच्या उपस्थितीत नागरी सभा